**रे. मु. क्र. ४१० /२००४**
MHAH250004252004
रामदास गेणु पांढरकर विरुध्द
दौलत शंकर पांढरकर वगैरे

**निशाणी क्र. ८० वरील आदेश**.

प्रस्तुतचा अर्ज वादीने कोर्ट कमिशनर यांच्या मोजणी वाद मिळकतीच्या हद्दी व निशाण्या कायम करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्यामध्ये दि.२६.०३.२०१० रोजी मो.र.क्र.१७३/२००९ प्रमाणे मोजणी झालेली होती. परंतु सदर कोर्ट कमिशनने कोर्टात सादर केलेल्या अहवालानुसार सदरचे कोर्ट कमिशन न्यायालयाच्या आदेशाशिवाय हद्द निशाण्या कायम करण्यास नकार दर्शवित आहेत. सदर कोर्ट कमिशनचे मोजणीप्रमाणे हददीनिशाण्या दर्शविल्यास वादी व प्रतिवादी यांचेदरम्यानचे वाद कायमस्वरुपी संपुष्टात येणार आहेत व त्याबाबत भविष्यातही तक्रारी शिल्लक राहणार नाहीत. त्यानुसार सदर दाव्यामध्ये मौजे ढवणवाडी, ता.पारनेर शिवारातील गट क्र.८४ ची मोजणी झाली आहे परंतु सदर मोजणीप्रमाणे हददी व निशाण्या कायम करण्याचा हुकुम व्हावा म्हणुन सदरचा अर्ज केला आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी क्र.८३ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर करुन अर्जातील कथने नाकारली आहेत व पुढे असे कथन केले आहे की, वादीचा सदरचा अर्ज बेकायदेशिर आहे, सदर दाव्याचा अंतिम युक्तीवाद पुर्ण झाला आहे, वादीने ज्या कोर्ट कमिशन अहवालाप्रमाणे अर्ज दिला आहे तो मोजणी नकाशा वादीने गुणदोषावर सिध्द केला नाही, सदर नकाशास निशाणी क्रमांक पडलेला नाही. सदर कोर्ट कमिशनर मोजणी नकाशा सन २०१० साली प्रकरणात दाखल झालेला आहे. सन २०२६ पर्यंत वादीने त्याबाबत काहीही कथन केले नाही. सदर कोर्ट कमिशन केवळ दावा मिळकत व परिसराची परिस्थिती न्यायालयासमोर येण्याच्या हेतुने झालेला होता. त्यामध्ये हददीखुणा कायम करण्याबाबत कोणतीही मागणी किंवा कोर्टाचा आदेश झालेला नाही. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी

विनंती केली. तसेच प्रतिवादींनी सदर आदेशाच्या कामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दोन न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

१. Bombay High Court (Aurangabad Bench) Writ Petition No.11390/2016 Dnyandeo Vitthal Salake Vs. Dagadu Kadar Inamdar.

२. Bombay High Court (Nagpur Bench) Writ Petition No.121/2019 Rameshwar Shravan Ghavat Vs. Babarao Keshavrao Rane and others.

४. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला. प्रस्तुत दावा हा निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा अंतिम युक्तीवाद देखील पुर्ण झालेला आहे. वादी व प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे सन २०१० मध्ये सदर वाद मिळकतीची परिस्थिती व परिसराची परिस्थितीत न्यायालयासमोर येण्यासाठी कोर्ट कमिशनर नेमण्यात आले होते. तसेच सदर कोर्ट कमिशनरचा अहवाल देखील अभिलेखावर दाखल केलेला असून वादीने त्यावर त्याचा खुलासा दिलेला दिसून येत नाही. सदर कोर्ट कमिशनर आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये हद्दीखुणाबाबत कोणतीही निर्देश दिलेले दिसून आले नाही. सदर प्रकरण हे गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक आहे. त्यानुसार दाव्यामध्ये वादी व प्रतिवादींचा संपुर्ण पुरावा होऊन अंतिम युक्तीवाद देखील झालेला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा हा निरंतर मनाई हुकुमाचा आहे. सदर दाव्यामध्ये निशाणी क्र.३९ वर मुददे काढण्यात आलेले आहेत व त्यानुसार दाव्यामध्ये वादीच्या मालकीबाबत तसेच मंदिराकडे जाणारा रस्ता अस्तित्वात आहे किंवा कसे याबाबत मुददे निश्चित केलेले आहेत. त्यामुळे सर्व मुददयांचे निष्कर्ष अंतिम निकालामध्ये काढले जाणारच आहेत. वादीच्या म्हणण्याप्रमाणे सद्य स्थितीमध्ये हददीखुणा निश्चित केल्यानंतर वादी व प्रतिवादींचा वाद संपुष्टात येईल हे योग्य होणार नाही. कारण वादी प्रतिवादींचा अंतिम युक्तीवाद देखील झालेला आहे आणि दावा न्यायनिर्णयाकामी प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादींनी दाखल केलेल्या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता सदर दोन्हीही न्यायनिर्णय संबंधीत प्रकरणांशी लागु होते असे दिसून येते. अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर अशाप्रकारचे अर्ज दाखल करुन हददीखुणा

निश्चित करणे योग्य होणार नाही. कारण वादी व प्रतिवादीं मधील वाद अंतिम निकालामध्ये निश्चित होणारच आहे. त्यामुळे सद्यस्थितीला वादीचा अर्ज हा बेकायदेशिर दिसून येत आहे व तो नामंजुर होण्यास पात्र ठरतो. म्हणुन मी खालीप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.८० नामंजुर करण्यात येतो.

MUBIN CHANDPASHA SHAIKH

Digitally signed by MUBIN CHANDPASHA SHAIKH
Date: 2026.04.08 15:55:36 +0530

दिनांक – ०८.०४.२०२६ ( एम. सी. शेख )
पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
पारनेर.